*Vidnyan Vari* **: Students Built a Replica of Chandrayaan-3**

# विद्यार्थ्यांनी तयार केली चांद्रयान-3 ची प्रतिकृती

## मराठी विज्ञान परिषदेतर्फे ‘विज्ञान वारी’ योजना



प्राचार्य डॉ. एल. पी. देशमुख यांना चांद्रयान-३ची प्रतिकृती भेट देताना प्रा. डी. एस. भारंबे, प्रा. आर. ए. पाटील, प्रा. आर. बी. देशमुख आदी.

**प्रतिनिधी** | जळगाव

मराठी विज्ञान परिषदेतर्फे विज्ञान वारी ही योजना दरवर्षी राबवली जाते. दरवर्षी नूतन मराठा महाविद्यालयाचे २० विद्यार्थी हा उपक्रम मराठी विज्ञान परिषद व नूतन मराठा महाविद्यालय विज्ञान विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने राबवत असतात. हे विद्यार्थी विविध शाळांमध्ये जाऊन प्रात्यक्षिकाद्वारे विज्ञान प्रसार करत असतात. नूतन मराठा महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी यंदा चांद्रयान-३ ची प्रतिकृती बनवत ती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एल. पी. देशमुख यांना दिली. मराठी विज्ञान परिषदेचे सचिव प्रा. डी. एस. भारंबे, मराठी विज्ञान परिषदेचे उपाध्यक्ष प्रा. आर. ए. पाटील, सायन्स असोसिएशनचे अध्यक्ष प्रा. आर. बी. देशमुख उपस्थित होते.